# मेट्रो ३ : भुयारी स्थानकांचे काम ८६ टक्के पूर्ण

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सिप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गिकेदरम्यानच्या मेट्रो स्थानकांचे काम ८६ टक्के पूर्ण झाले असून काही ठिकाणी टनेल बोअरिंग मशीन अर्थात टीबीएम मशिन्स बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड अर्थात एमएमआरसीएलने देखभालीसाठी खासगी कंपनीची निवड करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी निविदा जारी केल्या असून २० डिसेंबरपर्यंत उत्सुक कंपन्यांनी प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ च्या भुयारीकरणाचे ९९ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती एमएमआरसीएल



अधिकाऱ्यांनी दिली असून संपूर्ण प्रकल्पाचे काम ७५.६५ टक्के पूर्ण झाले आहे. भुयारी स्थानकांचे काम ८६ टक्के पूर्ण झाले आहे. या कामांमध्ये सरकते जिने, दुकाने, पोडिअम परिसराचाही समावेश आहे. मेट्रो मार्गिकेदरम्यान ४३ टक्के ट्रॅकचे काम, तर कारडेपोचे २९ टक्के काम पूर्ण झाले आहे. डिसेंबर २०२३ पर्यंत चाचणीसह मेट्रो ३ सेवेत दाखल करण्यासाठी एमएमआरसीएलची लगबग सुरू आहे. मेट्रो-३ मार्गिका संपूर्णतः भुयारी असल्यानेच देखभाल तसेच सुरक्षेच्या दृष्टीने खासगी कंपनीची नियुक्ती करण्याचा निर्णय एमएमआरसीएलने घेतला आहे. सध्या मेट्रो भुयारी स्थानकांवर सरकते जिने बसवण्याचे काम सुरू असून प्लॅटफॉर्म स्क्रीन डोअर्स, उदवाहन, तसेच इतर बाबींचे काम सुरू आहे.

आरे सारीपूत नगर येथे मेट्रो-३ चे कारशेड उभारण्यात येत असून मार्च ते जूनदरम्यान काम पूर्ण करण्यात येणार आहे. संपूर्ण क्षमतेने मेट्रो डब्यांची चाचपणी केल्यानंतरच डिसेंबर २०२३ पर्यंत पहिल्या टप्प्यादरम्यान मेट्रो लोकांच्या सेवेत दाखल होणार आहे.